पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/६/कावि/१३/२०१९
दिनांक : १०/१/२०१९

प्रति,

मा. ..................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक १९/१/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी- २०१९ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दिनांक १९/१/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.</u>**

**सूचना**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये )

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – २६</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जानेवारी-२०१९ ची मासिक मा.महापालिका सभा शनिवार दिनांक १९/१/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

------

अ) विशेष मा. महापालिका सभा क्र- १४ दि.२६/२/२०१८, दि.९/३/२०१८, दि.२०/३/२०१८ (सकाळी ११.०० व दु.३.००), दि.२३/३/२०१८ व दि.२७/३/२०१८ (दु.२.०० व दु.३.००) चा सभावृत्तांत कायम करणे.

आ) मा. महापालिका सभा क्र- २३ दि.२०/१०/२०१८ व दि.३१/१०/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

**<u>मा.विधी समितीचे ठराव</u>**

**विषय क्रमांक १)** संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.फक्षेका/स्था/९९३/२०१९ दि.२/१/२०१९
२) मा.विधी समिती ठराव क्र. ७६ दि.०८/०१/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये, “जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ” स्थापन करणेकामी मा.महापालिका सभा ठराव क्र.६८४ दि.१३/५/२०१५ अन्वये पारित झाला आहे. संतपीठाच्या स्थापनेच्या उपक्रमातुन संत साहित्याचा वारसा पिंपरी चिंचवड

महानगरपालिकेतील नागरीकांना मिळावा या उद्देशाने समाजाला अध्यात्मीक मार्गातुन चांगले विचार देण्याचा प्रयत्न राहील. संतपीठाच्या माध्यमातुन भविष्यात सांप्रदाय व अध्यात्मिक तत्वज्ञानाचा प्रसार होणार आहे. सर्व महान संतांचे विचार हे आजच्या पिढीपर्यंत पोहचविणे अत्यंत गरजेचे आहे जेणेकरून अशा उपक्रमाचा फायदा शहरातील वातावरण चांगले राहण्यासाठी मदत होईल. ज्या टाळगाव चिखली येथे संतपीठ होणार आहे, त्या गावास सांस्कृतिक व अध्यात्मिक वारसा लाभलेला आहे. संतपीठाच्या माध्यमातुन पिंपरी चिंचवड शहर हे संस्कृती जपणारे शहर असा उल्लेख, महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशभर होईल. पिंपरी चिंचवड परिसरामध्ये वारकरी व भागवत सांप्रदायाला मानणारा खूप मोठा समाज आहे. संत विचार, संस्कृती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी, संतपीठ कार्यरत करणेसाठी कंपनी कायद्यान्वये ना नफा तत्वावर कंपनी स्थापन करणेत येत आहे. त्यादृष्टीने या परिसरामधील मुलांना आध्यात्मिक व अधुनिक तंत्रज्ञानासह शिक्षण देऊन, त्याबरोबर संताच्या वाड्.मयाचा प्रसार होण्यासाठी व तशी फेरबदल करण्याची तरतुद, सी.बी.एस.सी. बोर्डच्या अभ्यासक्रमातच असल्याने त्याप्रमाणे अंतर्भावही निश्चीत करावयाचा आहे. यामध्ये सर्व सांप्रदाय व अध्यात्मिक तत्वज्ञानाचा अभ्यास यामध्ये करावा लागणार आहे. व त्यासाठी सी.बी.एस.सी. बोर्डाची मान्यता घ्यावी लागणार आहे. याठिकाणी मुलांचे अशा प्रकारे शिक्षण होणार आहे. की, त्याचा अध्यात्मिक पाया पक्का होईल व या माध्यमातुन चांगले नागरीक घडविणे शक्य होणार आहे. अभ्यासक्रम ठरविताना त्यामध्ये अनुषंगिक विविध विषयांचा अंतर्भाव करावा लागणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य फ मुख्य कार्यालयामार्फत, प्रभाग क्र.१ चिखली गट नं.१६५३ पैकी, आरक्षण क्र.१/८९, माध्यमिक शाळा, यावर शाळा व संतपीठासाठी इमारत बांधणेसाठी बांधकाम परवानगी घेतलेली आहे व त्याची निविदा कार्यवाही सुरू आहे. सदर कामाचा कालावधी ३० महिन्यांचा असणार आहे. " जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ ", या नावाने कंपनी स्थापन करावी लागणार आहे. सदर कंपनीचे व्यवस्थापन चालविणेसाठी, खालील प्रमाणे नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | नाव | पदनाम | कंपनीचे पदनाम |
|---|---|---|---|
| १ | श्री.श्रावण हर्डीकर | आयुक्त, पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध अध्यक्ष तथा संचालक |
| २ | श्री.जितेंद्र कोळंबे | मुख्य लेखा अधिकारी, पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध संचालक |
| ३ | श्रीम.ज्योत्स्ना शिंदे | प्रशासन अधिकारी, प्राथमिक शिक्षण विभाग, पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध सचिव तथा संचालक |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्री.पराग मुंढे | प्र.शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध सदस्य |
| ५ | श्री.चंद्रकांत इंदलकर | प्र.कायदा सल्लागार, कायदा विभाग पिं.चिं.म.न.पा. | पदसिद्ध सदस्य |
| ६ | डॉ.श्री.सदानंद मोरे | प्राध्यापक व संत साहित्याचे गाढे अभ्यासक | सदस्य |
| ७ | श्री.राजु ढोरे | हरि भक्त परायण | सदस्य |
| ८ | श्री.तानाजी शिंदे | सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी | सदस्य |
| ९ | श्रीम.स्वाती मुळे | तज्ञ सल्लागार | सदस्य |

वरीलप्रमाणे “ जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ ” ही कंपनी, कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ अंतर्गत ना नफा तत्वावर स्थापन करणेसाठी, Ministory of corporate Affairs यांचे कार्यालयाकडे मान्यता घेणेसाठी अर्ज करून, नोंदणी करणेस मान्यता देणेकामी. तसेच सदर कंपनी स्थापन करणेकरीता मे.के.जे.एल.अँड असोसिएट्स तर्फे श्री.क्षितिज लुंकड या कंपनी सेक्रेटरी यांची नेमणूक केली आहे. त्यांचेमार्फत कंपनी स्थापन करणेचे काम करणेत येणार आहे व त्या कंपनीमध्ये वरीलप्रमाणे संचालक व सदस्यांची नेमणूक करणेस मान्यता देणेकामी, तसेच कंपनीचे व्यवस्थापन चालविणेसाठी संघटनेचा मसुदा (Memorandum of Association) मान्य करण्यास संचालकांस अधिकार देण्यास मान्यता देणेकामी कंपनी स्थापन करण्यासाठी सध्याचे संचालकांची व अधिकारी सदस्यांची भविष्यात बदली होईल अथवा अन्य कारण असेल त्यावेळी नविन अधिकारी संचालकांची व अधिकारी सदस्यांची, Digital Signature Certificate (DSC) व Directors Identification Number (DIN) तयार करून घ्यावे लागेल त्यास मान्यता देणेकामी कंपनी स्थापन केल्यानंतर अभ्यासक्रम निश्चीत करून, संचालक मंडळामार्फत सी.बी.एस.सी. बोर्डाची मान्यता घेण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

<u>मा.आयुक्तांकडून आलेली पत्रे/कामे</u>

**विषय क्रमांक २)** संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
लेखा/३५/कावि/२७७/२०१८ दि.२०/१२/२०१८
२) तातडीचे विषयकामीचे पत्र क्र.
लेखा/३५/कावि/२७८/२०१८ दिनांक २०/१२/२०१८
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३५० दि.२०/१२/२०१८

परिवहन महामंडळाकरीता ४०० सीएनजी, बीआरटी, नॉन एसी बसेसच खरेदीकरीता मा.संचालक मंडळ ठराव क्र. ६ दि. २३/०५/२०१८ ला अनुसरुन बसेस खरेदीकामी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये मे. टाटा मोटर्स यांची निविदा प्राप्त झालेली आहे. त्यांनी बीआरटी साठी उपयुक्त असणा-या ९०० मी.मी. फ्लोअर हाईट, ११-१२ मी.लांबीच्या युरो-४, सीएनजी, आयटीएमएस व ७ वर्षे आयटीएमएस एएमसी व वॉरंटीसह प्रति बससाठी निगोसिएशन नंतर प्रति बस र.रु. ४८,४०,४५५/- इतका दर सादर केला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४० % हिश्याप्रमाणे ४०० पैकी १६० बसेस करीता प्रति बस र.रु. ४८,४०,४५५/- नुसार १६० बसेससाठी र.रु.७७,४४,७२,८००/- इतकी रक्कम पिंपरी चिंचवड मनपा कडुन परिवहन महामंडळाकडे वर्ग झालेनंतर पुढील खरेदी आदेश देणे व तद अनुषंगीक प्रक्रिया राबविणेत येणार आहे असे मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी.एम.पी.एम.एल. यांनी दिनांक १९/१२/२०१८ चे पत्रान्वये कळविले आहे.

विषयांकित कामाचा मनपाचे सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकात समावेश करणेत आलेला असून पीएमपीएमएल निधी अंतर्गत १,६४,५६,००,०००/- पैकी बसेस खरेदीसाठी र.रु. ६० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४० % हिश्याप्रमाणे १६० बसेस करीता प्रति बस र.रु. ४८,४०,४५५/- नुसार १६० बसेससाठी र.रु. ७७,४४,७२,८००/- इतकी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून पुणे महानगर परिवहन मंडळाकडे टप्प्या टप्प्याने गरज व मागणीनुसार वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(दिनांक १९/१/२०१९ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)**

**विषय क्रमांक ३)** संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
नरवि/कावि/६/२५३७/२०१८ दि.२४/१२/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये नगररचना योजना TP Scheme राबविण्यासाठी M/s HCP Consultant यांची विहीत प्रकीया पार पाडून सल्लागार म्हणुन नेमणुक झालेली आहे. त्या अनुषंगाने दिं. २७-११-२०१८ रोजी M/s HCP Consultant यांचे प्रतिनिधीं समवेत उपसंचालक, नगररचना यांची चर्चा झाली असुन खालील तक्त्यात नमुद गावांच्या भागांमध्ये एकुण १५ नगररचना योजना (TP Scheme) राबविणे शक्य आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे क्षेत्राचा तपशील | अंदाजे क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| १ | थेरगाव | स.नं. - १,२,३, ३४,३५, ३६,३७ | ३९.०० |
| २ | चिखली | गट.नं. - १०३ ते २०८, २१० ते २१२,२१९, २२१ ते २४७ ,२५६ ते २७४, २८४, २७६ ते २७८, ३५० ते ३५७, ३९७, ४१८ ते ४२०४४५ ते ४६०, ५०१ ते ५१५, ५२१ ते ५२४, ४९६ ते ५००, ४२१,४४४,४६१,४६२,४१३, ५१६, ४९६,४९४,४७६, ४७४,४६३ ते ४६९ , ४४३, ४२२ ते ४३०, ४४१, ४६९,४७०, ४३१, ४३२, ४३३, ४२६, ४४२, ४७१, ४७३, ४७२, ४१२, ४११, ४१०, ४०९, ४०८, ४१४, ४१६,४१७, ४०४, ४०६, ३९८, ४०७, ४०३, ४०५, ३९६, ३५८ ते ३८४, ४०२, ३२५ ते ३२९, ३८५ ते ३९७, ४००, ४०१, ४३६ ते ४४०, ४७७ ते ४९७, ५१८, ५१९, ५३०, ५२६, ५२७, ५३३, ५१७, ५२९, ५२०, ५२८, ५२५, ५३२, ५३४, ५३५, ५३३, ५३६ ते ५३८, ३४३, ३४६ ते ३४९, २७९, २७५, २८०, ३४५, ३४२, ३४४, २८१, ३४१, ३४०, ३३६, ३३०,३३२, ३३३,३२२, ३२४,३२३,३३४, ३३५, ३००ते ३२१, २८२, २९७,२९८, २९९, २९५, २९३,२८८, २८६,२८४,२८३ ,२८५, २८७, २८९, २९१, २९१,२९०, २९६,२९२, २९४,२५५, २५१,२५०, २५४,२५३, २५२, २४८,२४९. | १२८.०० |
| ३ | चिंचवड | स.नं. - ८, १३, १७,१८, १९,२०,२१, २२,४१,४२,४३, ४४, ४५ , ४६, ४७,४८, ४९, ५०,५१,५२,५३,५४,५५, ७०, ७१, ७२, ७३,३६, ८१,८२, ८३ ,८४, ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२,९३,९४,९५,९६, ९७, ९८, ९९, १००, १०१, १०२,१०३, १०४, १०५, १०६, १०७, १०८, १०९, ११०, १११.११२,११३ ,११४,११५,११६,११७, ११८,११९ ,१२०, १२१,१२२. | ११४.०० |
| ४ | च-होली | न.र.यो. क्र. १ - स.नं. - १२ ते २७ ,१६० ते १६९,१७२ ते १८२ , १८४ ते १९१ , १९३ ते १९७ , १९९ ते २००,२११ ते २००,२२१ ते २३२,२३३ ते २४८,२५०,२५० ते २५८ , २६० ते २६२,२६४ ते २८३ . | २०६.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | न.र.यो. क्र. २ - स.नं. ४३१,४८३ ते ४८९ , ४४६ , ४४८ पै , ४४९ पै , ४५० पै, ४५१ ते ४५८ , ४६१ , ४६४ ते ४६८ , ३८० ते ३८४ , ३८५ ते ३९१, ३९३ ते ३९५ , ३९६ पै, ३९६ पै , ३९२ पै , ३७९ पै , ३७९ पै , ३५८ ते ३६१ , ३६३ ते ३६४ , ३६७ ते ३६८ . | ११७.०० |
| | | न.र.यो. क्र. ३ - स.नं. ४३२ ते ४३५ , ४२५ ते ४२८ , ४४१ , ४४३ ते ४४५ , ४४७ , ४४८पै , ४४९ पै ४५०पै , ३९९ ते ४१० , ३५२ ते ३५७ , ३७० ते ३७८ , ३९७ पै ,३९६ पै, ३९२ पै , ३७९ पै , ३६९ पै , ३४७, ३९२ पै , ३७९ पै , ३६९ पै , ३४७ | १७९.०० |
| ५ | रावेत | न.र.यो. क्र. १ – स.नं. - ३२, ३४, ३१, ४१, ४२,४८ ,४९, ५०,५१,५२, ५३,५९,५४, ५६, ५५,५७,५८,६३,६२,६४,६५, ६०. | ५०.०० |
| | | न.र.यो. क्र. २ – स.नं.- ७३, ७२, ६६, ६७, ६८, ६९,७०, ७१,८२,८१, ८०,७९,८३,३८, ८४, ८५, ७८,७७,९५, ९४, ९३,८६, ८७,८८,८९,९० ,९१, ९२,९७,९८,९९,१००,१०१, १०३, १५०,१५१, १५३,१४९,१४८, १५२, १४५,१४६,१४३,१४२,१४०,१३९,११३,११४,११७,११८,१२१, १२२,११०,१०५,१०४,१०९,११६,११९,१२०,१०६,१०७,१३७, १३८,१३६,१३४,१३५,१३३,१३२, १२३. | २५०.०० |
| ६ | किवळे | स.नं. - १ ते ६ , ८ ते २२ , ३७ , ७९ ते ८३ , ८५ , ८८ ते १०२ , ११० | २८७.०० |
| ७ | पुनावळे | स.नं. - ११ ते १४ , १६ ते २७ , २८ ते ४० , ४१ ते ४८ , ५० ते ५३ | ३९१.०० |
| ८ | ताथवडे | न.र.यो. क्र. १ - स.नं. - २८ ते ४१ , ४२ पै , ६२ ते ८० , १२६ , १२९ पै , १३३ ते १७१ , | १९०.०० |
| | | न.र.यो. क्र. २ - स.नं. - ८६ , ८९ ते १०० , १०१ ते ११५ , ११६ ते १२७ | १५६.०० |
| ९ | मामुर्डी | स.नं. - १ ते ४ , ६ ते १२ , १३ पै , १९ पै , ३२ पै , ३३ ते ३५ | १०४.०० |
| १० | डुडुळगाव | न.र.यो. क्र. १ - गट. नं. - १९१ पै ते १९६पै, १९७ ते २००, २०१पै ते २०२ पै, ३०५, २०६, २१०, २११, २१२पै ते २१६पै, २१७, २१८, २२३ ते २४०, २४३ पै, २४१पै, २४२, २०४पै. | १३०.०० |
| | | न.र.यो. क्र. २ - गट. नं. - ५० , ५१ पै, ५४ ते ६४, ६५पै ते ६६ पै, ६९ ते १०३, १७५ ते १८२, १८३ पै ते १८६ पै, १८८पै, १८९ पै. | ५९.०० |
| ११ | मोशी | न.र.यो. क्र. १ – गट नं - ५२६, ५२७, ५३०, ५२५, ५२३, ५२१, ५१९, ५१५, ५१४, ५१३, ५१२, ५१०, ५०९, ५०६, ५०७, ५३१, ५३२, ५३३, ५३४, ५३५, ५३६, ५३७, ५३८, ५३९, ५४०, ५१८, ५१७, ५१६, ५०८, ५०४, ५०३, ५०२, ५०१, ४९५, ४९४, ४९२, ४९३, ४९७, ४९८, ४८८, ४८९, ४८७, ४८६, ४९०, ४९१, ४८३, ४८५, ४८४, ४७८, ४७७, ४८२, ४७७, ४८१, ४८०, ४७९, ४७६, ४७५, ४७३, ४७४, ४७२, ४७१, ४७०, ४६९, ४६७, ४६८, ४६६, | १०२.६९ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४६५, ४५१, ४५०, ४५३, ४५४, ४५५, ४५६, ४५७, ४५९, ४५८, ४४२, ४४१, ४४३ ( सर्व जुने ) | |
| | | न.र.यो. क्र. २ – गट नं - ४३५, ४३४, ४३३, ४३२, ४३९, ४१८, ४१९, ४३०, ४२९, ४२८, ४१७, ४१६, ४१८, ४२७, ४१५, ४१४, ४१३, ४१२, ४२६, ४२५, ४२३, ४२४, ४२१, ४२२, ४०२, ४०४, ४०७, ४०५, ४०३, ४०१, ४०८, ४०९, ४१०, ३८८,, ३८९, ३९६, ३९७, ३९१, ३९०, ३९३, ३९२, ३९४, ३९५, ३९६, ३८१, ३८२, ३८३, ३८४, ३८५, ३८०, ३७९, ३३९, ३३८, ३३७, ३३६, ३३४, ३३५, ३३३, ३३१, ३३०, ३२९, ३२८, ३२७, ३२६, ३२४, ३१७, ३१८, ३१९, ३२०, ३२२, ३२१, ३२४, ३२३, ३१६, ३१५, ३१४, ३१३, ३१२, ३११, २४९, २४७, २४६ ( सर्व जुने ) | ९३.५१ |
| १२ | बो-हाडेवाडी | न.र.यो. क्र. १ मौजे बो-हाडेवाडी मधील शेती विभागातील जमीन रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतच्या म. प्रा. न. व अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावयाचे क्षेत्र | ७८.२२ |

सबब वरील तक्त्यात नमुद केलेल्या गावांमधील क्षेत्रात तसेच मा. आयुक्त वेळोवेळी तातडीनुसार सुचवतील त्या क्षेत्रासाठी तसेच सोबतच्या नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नगररचना योजना (TP Scheme) राबविण्यास मान्यता देणेस, व मा.महापालिका सभेच्या मान्यतेने महानगरपालिका क्षेत्रात नगररचना योजना (TP Scheme) राबविण्याचे निश्चित होणा-या क्षेत्रात महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे तरतुदी नुसार सर्व वैधानिक कार्यवाही करण्यास उदा. नगररचना योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे, प्रारूप नगररचना योजना मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सल्लामसलतीने तयार करून प्रसिध्द करणे, हरकती/सुचनांचा विचार करणे, तदनंतर प्रारूप नगररचना योजना शासनास मान्यतेसाठी सादर करणे इत्यादी प्रकीया करण्यास मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास देखील मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक ४)** संदर्भ –१) मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/०१/२०१९ दि.४/०१/२०१९

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी

चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,९४,९६१/- व ९,१०,५४,९७४ /- असे एकुण र. रु १४,०४,४९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१२/२०१८ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १५५४९ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १५५४९ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १३०८३ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१२४६४ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- ८३५३<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४१११ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ९०९९ लाभार्थी | GOI+GOM=५४५.९४लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB = १८१.९८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |

| | | | |
|---|---|---|---|
| | **एकुण** | **७२७.९२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ८२४५ लाभार्थी | GOI+GOM=४९४.७०लाख | GOI = २०००/-व<br>GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१६४.९० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **६५९.६० लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

**विषय क्रमांक ५)** संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
वैद्य/१/कावि/१६४२/२०१८ दि.०८/०१/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत ०८ रुग्णालये व २७ दवाखाने कार्यरत आहे. त्यापैकी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय हे बहुविध शाखांचे व ७५० खाटांच्या क्षमतेचे सर्वात मोठे रुग्णालय कार्यरत असून, त्यामार्फत महापालिका हद्दीतील नागरिकांना वैद्यकिय सेवा पुरविण्यात येते. त्याचप्रमाणे महापालिका हद्दीचे नजीक असणा-या ग्रामीण भागातील रुग्ण देखील या रुग्णालयामध्ये वैद्यकिय उपचारार्थ मोठ्या प्रमाणात दाखल होत असतात.

महापालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत कार्यरत असणारी रुग्णालये व दवाखान्यांकरीता विविध संवर्गातील गट "अ" मधील ५८ व "ब" मधील ९३ अशी एकुण १५१ पदे निर्माण करणेत आलेली आहेत. त्यामधील तज्ञ वैद्यकिय अधिकारी या संवर्गातील बहुतांशी पदे ही यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता निर्माण करणेत आलेली आहेत. सद्यस्थितीमध्ये गट "अ" मधील स्त्रीरोग तज्ञ ०१, सर्जन १, फिजिशियन ५, कान-नाक-घसा तज्ञ ०१, क्ष किरण शास्त्रज्ञ ०२, भुलतज्ञ ०३, अस्थिरोग तज्ञ ०२, त्वचा व गुप्तरोग तज्ञ ०१, बालरोग तज्ञ ०२, कार्डीओलॉजिस्ट ०१ व टी.बी.ॲन्ड चेस्ट फिजिशियन ०१ इत्यादी पदे रिक्त असून, गट "ब" मधील वैद्यकिय अधिकारी अभिनामाची १२ पदे रिक्त आहेत.

महापालिकेच्या प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी तज्ञ वैद्यकिय अधिकारी तसेच वैद्यकिय अधिकारी या संवर्गातील पदे भरणेबाबत जाहिरात प्रसिध्द करुन देखील पुर्ण क्षमतेने अधिकारी उपलब्ध होत नाहीत. परिणामी महापालिकेमार्फत देण्यात येणा-या वैद्यकिय सेवेवर या विपरित परिणाम होत असून, तज्ञ वैद्यकिय अधिकारी/वैद्यकिय अधिका-यांची कमतरता नेहमीच

जाणवत असते. यावर महापालिकेमार्फत मानधन स्वरुपात, मानसेवी तज्ञ त्याचप्रमाणे सी.पी.एस. अंतर्गत वैद्यकिय अधिकारी उपलब्ध करुन घेणेत येऊन, काही प्रमाणात वैद्यकिय अधिकारी उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न केला जातो. मागील ५ वर्षामध्ये एकुण ५३ तज्ञ वैद्यकिय अधिकारी/वैद्यकिय अधिकारी महापालिका सेवेतून सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त/ राजीनामा देऊन गेलेले आहेत. त्यामुळे महापालिकेची आर्थिक क्षमता असुनही तज्ञ वैद्यकिय अधिका-यांचे अभावी रुग्णसेवा पुरविणे शक्य नाही.

आता महापालिकेचे भोसरी येथे नव्याने उभारणी होत असलेले सुसज्ज रुग्णालय कार्यान्वित करणेत येणार आहे. या ठिकाणी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामार्फत दिल्या जाणा-या Speciality प्रकारच्या एकुण १६ वैद्यकिय सुविधांसह Super Speciality प्रकारातील Neurology, Plastic Surgery, Cardio - Thoracic, Nephrology, Oncology, Endocrinology, Gastro Enterology, Uro Surgery, Vascular Sergery तसेच Paediatric Surgery इ. १० वैद्यकिय सेवांचा देखील समावेश केला जाणार आहे. Super Speciality प्रकारातील या १० सेवा यशवंतराव चव्हाण रुग्णालयामध्ये देखील उपलब्ध नाही.

महापालिकेमध्ये असणा-या तज्ञ वैद्यकिय अधिका-यांची कमतरता तसेच मोठ्या प्रमाणातील रुग्णसंख्येचा विचार करता, सदरचे रुग्णालय पुर्ण क्षमतेने चालविणे महापालिकेस शक्य होणार नाही. याकरीता सदरचे रुग्णालय खाजगी संस्थेमार्फत चालविण्यास देण्याचे प्रयोजन आहे. सदरचे रुग्णालय महापालिकेमार्फत चालवावयाचे झाल्यास याकरीता साधारणतः अंदाजे एकुण र.रु. १७ कोटी इतका अंदाजे वार्षिक खर्च झाला असता व ७ व्या वेतन आयोगानंतर या खर्चामध्ये अंदाजे २० टक्के वाढ झाली असती.

सदरचे रुग्णालय खाजगी संस्थेस देणेकरीता प्रयोजन असले तरी यामध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे नमुद बाबींचा समावेश आहेः

१. महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्ये वैद्यकिय उपचरांकरीता महापालिका हद्दीतील पिवळे व केशरी शिधापत्रिका व आधारकार्ड धारक रुग्णांना मोफत वैद्यकिय सेवा दिली जाते त्याचप्रमाणे या रुग्णालयामध्ये देखील देणेत येणार आहे

२. महापालिका हद्दीबाहेरील, रहिवासी पुरावे नसलेले व श्वेत शिधापत्रिकाधारक रुग्ण यांचेकडून रुग्णालयामार्फत दिल्या जाणा-या सेवांकरीता CGHS अंतर्गत निश्चित केलेल्या शुल्कानुसार आकारणी केली जाणार

३. सदरचे रुग्णालय चालविणेकरीता एकुण ३० वर्षे इतक्या कालावधीचा करारनामा केला जाणार आहे.

४. सर्व Speciality प्रकारच्या सुविधा तसेच याकरीताचे तज्ञ वैद्यकिय अधिकारी उपलब्ध करुन देणे बंधनकारक

५. Super Speciality अंतर्गत असणा-या Neurology, Plastic Surgery, Cardio - Thoracic, Nephrology, Oncology, Endocrinology, Gastro Entrology, Uro Surgery, Vascular Sergery तसेच Paediatric Surgery इ. प्रकारच्या सेवांचा यामध्ये समावेश केला जाणार आहे.

६. खाजगी तत्वावर चालविणेस दिल्या जाणा-या रुग्णालयाकरीता कोणतेही भाडे आकारणी केली जाणार नाही, तथापि वीज बील, पाणी बील इ. खर्च करणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहिल.

७. सदरचे रुग्णालयामध्ये काही उपकरणे महापालिका पुरविणार असून, Super Speciality अंतर्गत आवश्यक उपकरणे संबंधित खाजगी संस्थेमार्फत उपलब्ध करुन घेतली जातील. याबाबतची यादी सोबत प्रपत्र “अ” मध्ये जोडलेली आहे.

८. याकरीता आवश्यक असणारा सर्व डॉक्टर्स तसेच पॅरामेडिकल व अन्य कर्मचारी वर्ग हा खाजगी संस्थेमार्फत उपलब्ध करुन घेतला जाणार आहे. याबाबतची यादी सोबत प्रपत्र “ब” मध्ये जोडलेली आहे.

९. पॅथॉलॉजी / लॅब सुविधा विभाग NABL प्रमाणित व रुग्णालय हे NABH प्रमाणित असणे आवश्यक असणार आहे.

१०. रुग्णालयामध्ये “जन औषधी स्टोअर्स” उपलब्ध करुन देणे संबंधित संस्थेवर बंधनकारक असेल

११. महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत नोंदणी करुन घेणे संबंधित संस्थेवर बंधनकारक असेल

१२. NLEM अंतर्गत एकुण ३६८ प्रकारची औषधे पिवळे / केशरी रेशनकार्ड धारक रुग्णांना मोफत उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

१३. रुग्णालयाचा तसेच औषधाच्या दुकानाचा वार्षिक ताळेबंद महापालिकेला सादर करणे बंधनकारक असेल.

१४. त्याचप्रमाणे सदर रुग्णालयामध्ये नवीन वैद्यकिय विभाग सुरु करावयाचा असल्यास त्यास महापालिका आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक राहिल.

तरी साधारणतः वरीलप्रमाणे बाबींचा समावेश असलेल्या अटी व शर्तीचे अनुषंगाने महापालिकेचे भोसरी रुग्णालय खाजगी संस्थेस निविदा प्रसिध्द करुन चालविण्यास देणेचे प्रयोजन आहे. महापालिकेने विहित केलेल्या सेवा पुरविणेकरीता संबंधित संस्थेला रक्कम खर्च करावी लागणार आहे. या सेवा पुरविणेकरीता महापालिकेला साधारणतः अंदाजे १७ कोटी रु. वार्षिक खर्च अपेक्षित असून ७ व्या वेतन आयोगानंतर यामध्ये अंदाजे आणखी र.रु. ३ कोटी इतक्या रकमेची वाढ होईल. त्यानुसार महापालिकेचा सदर रुग्णालय चालविणेकीरता होणारा खर्च व संस्थेमार्फत पुरविल्या जाणा-या सेवांकरीता त्यांना मिळणारे उत्पन्न यांच्यामधील दर फरकाचे viability gap funding तत्वानुसार सदरची निविदा प्रसिध्द करणेबाबत विचाराधीन आहे. याकरीता viability gap funding नुसार निश्चित करावयाची रक्कम महापालिकेच्या सल्लागारांमार्फत निश्चित करुन घेतली जाणार आहे.

तरी महापालिकेचे भोसरी रुग्णालय खाजगी तत्वावर चालविणेस देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

------

## समित्यांचे अहवाल

### विधी समिती

**विषय क्रमांक ६)** दिनांक ०७/१२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

--------

### मा.महिला व बालकल्याण समिती

**विषय क्रमांक ७)** दिनांक ०५/१२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

--------

## मा.शहर सुधारणा समिती

**विषय क्रमांक ८)** अ) दिनांक २८/११/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक १२/१२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

## मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

**विषय क्रमांक ९) अ)** दिनांक १२/११/२०१८ व दिनांक २६/११/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दिनांक १४/१२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

## शिक्षण समिती

**विषय क्रमांक १०)** अ) दिनांक ०६/१२/२०१८ चा सभावृत्तांत कायम करणे.

**--------**

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/६/कावि/१३/२०१९
दिनांक : १०/१/२०१९

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्)
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

( विषय क्र. ५ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
वैद्यकीय मुख्य कार्यालय
विषयपत्र क्र. वैद्य/१/कावि/१६४२/२०१८, दि. ०८-०९-२०१९ चे सोबत

प्रपत्र 'अ'

संस्थेमार्फत उपलब्ध करुन घेण्यात येणारी वैद्यकीय उपकरणे

| क्र. | उपकरणांची नावे |
|---|---|
| १ | Ultrasound Machine |
| २ | Digital X-ray machine with CR |
| ३ | Dialysis machine |
| ४ | Mammography |
| ५ | Pulmonary function test machine |
| ६ | Central Sterile services dept. equipment (CSSD) |
| ७ | 2D Echo |
| ८ | Color doppler |
| ९ | ECG machine |
| १० | Defibrillation |
| ११ | EEG machine |
| १२ | All pathology equipments |
| १३ | Fracture tabe with all orthopedic attachments |
| १४ | Tourniquet Digital |
| १५ | Shadowless lamps |
| १६ | Workstation Anesthesia |
| १७ | O T tables |
| १८ | Electric Cautery |
| १९ | Flash autoclave |
| २० | Mechanised Drill and saw system |
| २१ | Computer and Printers |
| २२ | Office furniture |
| २३ | R.O. Plant |

(डॉ. के. अनिल रॉय)
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
वैद्यकीय मुख्य कार्यालय
विषयपत्र क्र. वैद्य/१/कावि/१६४२/२०१८, दि. ०८-०९-२०१९ चे सोबत

प्रपत्र 'ब'

खाजगी संस्थेमार्फत उपलब्ध करुन घेतला जाणारा डॉक्टर्स व पॅरामेडीकल व अन्य कर्मचारी वर्ग

➢ डॉक्टर्स व तज्ञ डॉक्टर्स

| अ.क्र. | पद | आवश्य कता |
|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिक्षक | १ |
| २ | फिजिशियन (Physician) | ३ |
| ३ | शल्यचिकित्सक Surgeon | २ |
| ४ | Dermatologist | १ |
| ५ | भुलतज्ञ Anesthetist | ३ |
| ६ | कान नाक घसा तज्ञ ENT Surgeon | १ |
| ७ | नेत्रतज्ञ Ophthalmologist | १ |
| ८ | अस्थिरोग तज्ञ Orthopedician | २ |
| ९ | रेडिओलॉजिस्ट Radiologist | १ |
| १० | मानसोपचार तज्ञ Psychiatrist | १ |
| ११ | नेफ्रॉलॉजिस्ट Nephrologist | १ |
| १२ | कार्डीओलॉजिस्ट Cardiologist | १ |
| १३ | ऑन्कोलॉजिस्ट Oncologist | १ |
| १४ | Endocrinologist | १ |
| १५ | न्यूरोलॉजिस्ट Neurologist | १ |
| १६ | Gastroenterologist | १ |
| १७ | वैद्यकिय अधिकारी Casualty Doctors / General Duty Doctors | ९ |
| १८ | पॅथॉलॉजिस्ट Pathologist with DCP / MD (Micro) MD (Path) / MD (Biochemistry) | १ |
| १९ | AYUSH फिजिशियन | ३ |
| २० | निवासी वैद्यकिय अधिकारी Resident Doctors | १० |
| | एकुण | ४५ |

➢ पॅरामेडीकल व अन्य कर्मचारी वर्ग

| अ.क्र. | पद | आवश्य कता |
|---|---|---|
| १ | स्टाफनर्स | ५० |
| २ | सिस्टर इन्चार्ज | ६ |
| ३ | वॉर्ड बॉय | ४० |
| ४ | नेत्रतज्ञ सहाय्यक (Ophthalmic Asst. / Refractionist) | १ |
| ५ | ई.सी.जी. टेक्निशियन ECG Techician | १ |
| ६ | ऑडीओमेट्रीशियन Audiometrician | १ |
| ७ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ Laboratory Tech. | ५ |
| ८ | प्रयोगशाळा सहाय्यक Laboratory Asst. | ३ |
| ९ | रेडीओग्राफर Radiographer | ३ |
| १० | फार्मासिस्ट Pharmacist | ६ |
| ११ | डाएटीशियन Dietician | १ |
| १२ | फिजिओथेरपिस्ट Physiotherapist / Occupational Therapist / Rehabiliation therapist | १ |
| १३ | वैद्यकिय सामाजिक कार्यकर्ता Counselor / Medical Social Worker | २ |
| १४ | वैद्यकिय अभिलेख तंत्रज्ञ Medical Record Officer / Techinician | १ |
| १५ | एक्स रे टेक्नीशीयन X-ray Technician | ३ |
| १६ | डायलिसिस टेक्नीशीयन Dialysis Technician | २ |
| | एकुण | १२६ |

(डॉ. के. अनिल रॉय)
आरोग्य वैद्यकीय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८